# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक १९ /०१/२०१८**

**सायं ४.३० वा.**

| | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/१२/२०१७ व २७/१२/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/१२/२०१७ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहेत.<br>अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २. | प्रश्नोत्तरे | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ अन्वये समा. सदस्यांचे प्रशोत्तराबाबत विवरणपत्र |

| अ.क्र | सभेची तारीख | प्रश्नकर्त्या सदस्यांचे नाव व अर्जाची तारीख | विषयाचा तपशील | कार्यवाहीसाठी कोणास पाठविले व त्यांची तारीख | अर्जदारास उत्तर दिलेबाबत माहिती/तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९/०१/२०१८ | मा. धनंजय विठ्ठल गावडे | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात एकूण अग्शिमन केंद्र व उपकेंद्रांची संख्या व ठिकाणे कार्यरत वाहनाचा तपशील, प्राप्त निविदांची माहिती, कर्मचारी पुरविणेचा ठराव मंजूर ठेकेदार केलेले करारनामा अदा केलेली देयके व देय वेतनाबाबत (कर्मचाऱ्यांना) केलेली कार्यवाही इत्यादी माहिती | मा. प्र. अग्निशमन अधिकारी दि.०४/०१/२०१८ | दि.१३/०१/२०१८ रोजी प्रश्नकर्त्या सदस्यास माहीती दिलेली आहे. |
| २. | १९/०१/२०१८ | मा.धनंजय गावडे | म.न.पा. हद्दीत पाण्याची पाईप लाईन दुरुस्ती ठेका निविदा कधी राबविली ? प्राप्त | मा.शहर अभियंता | दि.१६/०१/२०१८ रोजी प्रश्नकर्त्या |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | निविदा संख्या, ठेकेदाराबरोबर केलेलाकरारनामा, कार्यादेश, मुतवाढ,कर्मचारी (कार्यरत) संख्या, देय,वेतन, पी.एफ, बोनस इ. बाबत केलेली कार्यवाहीची माहिती | | सदस्यास माहिती दिलेली आहे. |
| ३. | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव. | | | | | | |
| ४. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती सी, चंदनसार आस्थापनेवरील कर्मचारी श्रीमती मणी वसंत गोयल, सफाई कामगार यांना स्वेच्छा निवृत्ती देणेबाबत. | ठराव/निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्रीमती मणी वसंत गोहेल, सफाई कामगार, प्रभाग समिती- सी, चंदनसार यांना दि. ३१/०१/२०१८ रोजी मध्यान्होत्तर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चा नियम ६८ अन्वये स्वेच्छा सेवानिवृत्त करणेस मान्यता आहे. तसेच श्रीमती गोहेल यांना स्वेच्छा सेवानिवृत्तीनंतर दयावयाचे अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (नरेंद्र पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** | | | | | |
| ५. | वसई विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती सी, चंदनसार आस्थापनेवरील कर्मचारी श्री. कैलास पांडूरंग राठोड, सफाई कामगार यांना रुग्णता सेवा निवृत्त करणेबाबत. | ठराव/निर्णय :- वसई विरार शहर महानगरपालिकेतील कर्मचारी श्री. कैलास पांडूरंग राठोड, सफाई कामगार, प्रभाग समिती- सी, चंदनसार यांना दि. ३१/०१/२०१८ रोजी मध्यान्होत्तर महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ चा नियम ८० अन्वये रुग्णता सेवानिवृत्त करणेस मान्यता आहे. तसेच श्री. राठोड यांना रुग्णता सेवानिवृत्तीनंतर दयावयाचे अनुषंगिक लाभ अदा करणेस आजची ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (नरेंद्र पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** | | | | | |
| ६. | चुळणे येथील कौल हेरीटेज येथे उंच साठवण टाकीजवळ कर्मचारी निवासस्थान बांधणे व कर्मचारी निवासस्थानाचा परिसर सुशोभित करणे आणि संरक्षण भिंत बांधणेकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. | ठराव/निर्णय :- वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (नितीन राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** | | | | | |

| | | |
|---|---|---|
| ७. | वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा जलशुध्दीकरण केंद्र व उपांगाच्या ठिकाणी पाणी शुध्दीकरणासाठी विविध रसायणे (क्लोरीन गॅस टनर व पी.ए.सी) पुरवठा करणे कामी सुधारीत प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत. | **ठराव / निर्णय :-** वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त कामी वाढीव खर्च रक्कम रु. ४६,०२,४१८/- गृहीत धरुन रक्कम रु. १,३१,८२,०००/- रक्कमेस सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (किशोर ग. पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८. | वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात "स्वच्छ भारत अभियान" अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी Pay and Use तत्वावर नोंदणीकृत संस्थांमार्फत स्वच्छतागृहे बांधणेसाठी आलेल्या अर्जांबाबत विचार विनीमय करणे. | **प्रस्तावाचा निर्णय :-** सदर बाबत संस्थाशी करारनामा करणेस व कार्यादेश देणेस तसेच अशाप्रकारच्या पुढील येणाऱ्या संस्थांबाबत निर्णय घेणेचे अधिकार मा.आयुक्त ह्यांना प्रदान करण्यात येत आहेत.<br>**अनुमोदक :- (अब्दुल हक पटेल) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९. | अ) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५ (६) अन्वये वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन समितीवर खालील सदस्यांच्या रिक्त होणाऱ्या जागांवर नविन यथोचित रित्या अर्हता प्राप्त व्यक्तींच्या नेमणुका करणे<br>१. घोन्सालविस जोजफ मार्शल<br>२. कुंदन मधुसुदन विरारकर<br>३. सिध्दार्थ शंकरराव शिरसाट<br>४. हबीब महमद पटेल<br>५. प्रितेश हरेश्वर पाटील | **प्रस्तावाचा निर्णय :-** सबब.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २५(२) चा विचार करुन महानगरपालिकेची आजची सर्वसाधारण सभा परिवहन समिती वर श्री. हेमांग मनसुखलाल शहा यांचे सह १) कुंदन मधुसुदन विरारकर २) सिध्दार्थ शंकरराव शिरसाट ३) वसंत दगडू वरे ४) अफजल सिकदंर डबरे ५) प्रितेश हरेश्वर पाटील ६) हबीब महमद पटेल यांची वसई विरार शहर महानगरपालिकेच्या परिवहन समिती सदस्य पदावर नेमणूक करीत आहे.<br>**अनुमोदक :- (अब्दुल हक पटेल) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| | ६. अफजल सिकंदर इबरे<br>ब) तसेच उदय ढास्कादास कार्वा यांचे निधन झाल्याने त्यांचे रिक्त पदावर त्यांचे निहीत कालावधीसाठी कलम २५ (१) अन्वये नेमणूक करणे. | |
| १० | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी वाढीव १०० द.ल.ली. प्रतिदिन क्षमतेच्या योजनेची मुख्य जलवाहिनी अंथरणांच्या मार्गातील खाजगी व अन्य आवश्यक जागा संपादित/ सहमती मिळण्यासाठी येणाऱ्या खर्चास सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत. | **प्रस्तावाचा निर्णय :-** मा.सर्वसाधारण सभा दि. १६/१२/२०१४ ठराव क्र. १६ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत वाढीव १०० द.ल.ली सुर्या टप्पा -३ पाणी पुरवठा योजनेच्या मुख्य जलवाहिनीच्या मार्गीकेतील खाजगी जागा मालक/शेतकरी यांना शासकीय दराप्रमाणे मोबदला ठेकेदारामार्फत (युजर चार्जेस) अदा करुन महापालिकेमार्फत देयकाची प्रतिपुर्ती करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार ठेकेदाराने कार्यवाही केल्याने रु. ६० लक्षच्या मर्यादित ठेकेदारास देयके प्रदान केली आहेत. सदर कामी ठेकेदाराने तीसरे देयक रु. ३८,७९,२००/- सादर केले आहे. तसेच या पुर्वी अदा केलेल्या दुसऱ्या देयकातील शिल्लक रक्कम रु. १,५४,५३०/- असे एकुण रु. ४०,३३,७३०/- ठेकेदारास अदा करावयाचे आहेत. सद्य:स्थितीत विरार फाटा ते चंदनसार व नालासोपारा फाटा ते नालासोपारा श्रीप्रस्थ पर्यंत जलवाहिन्या अंथरणेची कामे ठेकेदारामार्फत सुरु करण्यांत आली असुन खाजगी जागा संपादन / सहमती मिळवुन युजर चार्जेस अदा करणे कामी अंदाजे रु. १० लक्ष खर्च अपेक्षित असल्याने वरिल सर्व एकूण रु. १,१०,३३,७३०/- खर्चास सुधारीत आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (अब्दुल हक पटेल) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११. | सन २०१६-१७ वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना (उसगाव/शिरवली) उद्भव २० द.ल.ली. क्षमता योजना चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे कामी मुदतवाढ मिळणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय :-** वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामाच्या मंजूर ठेकेदार मे. आर. जी. कंस्ट्रक्शन यास नविन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत मुल्यवर्धीत भाववाढ न देता मुदतवाढ तसेच त्यायोगे येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | | |
|---|---|---|
| १२ | सन २०१७/१८ च्या अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकातील तरतुदीचे पुर्न:विनियोजन करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव / निर्णय :- सदरचा विषय स्थायी समितीच्या अखत्यारीत असल्याने तो विषयपत्रिकेवरुन मागे घेण्यास मा.आयुक्त यांनी विनंती केली असल्याने सदरचा प्रस्ताव आजच्या विषयपत्रिकेवरुन मागे घेण्यास मान्यता देणेत येत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| १३ | महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांना शहरात भूमिगत केबल अंथरणे कामी रस्ता खोदाई शुल्क दरात सवलत देण्यास मान्यता मिळणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय :-** महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी तर्फे वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी अंडरग्राऊंड केबल टाकणे कामी त्यांनी अर्जात मागणी केलेल्या ठिकाणी खोदाई पूर्नभरणा करणे कामी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. १४ दि.२०/०३/२०१३ रोजी निश्चित केलेले दर कमी करुन रु.२३००/- प्रती रनिंग मीटर (एकत्रित) दराने आकारणी करणेस हि सभा मान्यता देत आहे असे हि सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक :- (वृंदेश पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |

**नगरसचिव**
**वसई विरार शहर महानगरपालिका**